UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष :९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०९





स्थापना : ९ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ९

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा.डॉ.बी.आर.मस्के ● प्रा.डॉ.दिपाली भावे ● प्रा.प्रफुल राजुरवाडे

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ पं. जवाहरलाल नेहरू : स्वातंत्र्योत्तर भारतातील शैक्षणिक क्षेत्राचे शिल्पकार
- डॉ.सौ.अभिलाषा राऊत, नागपूर ---------- ८

२ भारत देशाच्या कृषी क्षेत्रातील विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान - डॉ.अफरोज शेख, नागपूर १३

३ आधुनिक भारताच्या इतिहासात बाबू हरदास एल. एन. यांचे सामाजिक व राजकीय योगदान
- डॉ.आनंद सूर्यवंशी, नागपूर ---------- १६

४ अर्वाचीन योगसाहित्य: ध्यान विमर्श - डॉ.अरुणा पवार, नागपूर ---------- २१

५ स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगना - मॅडम कामा
- डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे. ---------- २५

६ १९२० ते १९४७ या काळातील स्वातंत्र्यचळवळीतील महिलांचे योगदान कस्तुरबा गांधी व सहकारी महिला - डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- २९

७ राष्ट्र बांधणीमध्ये स्त्रीया, दलित आणि आदिवासी यांचे योगदान
- डॉ.अशोक शहाणे, उमरेड, जि.नागपूर ---------- ३३

८ आंबेडकरोत्तर भूमिहीन सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान
- डॉ.बी. आर. मस्के, नागपूर ---------- ३८

९ ई. व्ही. रामास्वामी पेरियार यांच्या कार्यांचा भारतीय समाजव्यवस्थेवरील प्रभाव
- डॉ. भास्कर बघाळे, नागपूर ---------- ४२

१० वर्षावास, भिक्खु संघ व दानादि कर्म
- १)डॉ.भीमदेवी डांगे, २) डॉ.स्निग्धा राजेश कांबळे, ब्रह्मपुरी ---------- ४६

११ १९४६ नागपूर येथील सत्याग्रह आणि ॲड. हरिदास बाबू आवळे यांची भूमिका
- डॉ.चंद्रशेखर पाटील, नागपूर ---------- ५२

१२ आधूनिक भारताचे निर्माते महात्मा जोतिराव फुले यांची शेतकरी चळवळ
- डॉ.दत्ता हिंगमिरे, उरण, जि.रायगड . ---------- ५६

१३ राजश्री शाहु महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान - डॉ. देविदास गाडेकर, नागपूर ---------- ६०

१४ महात्मा जोतिराव फुले आणि सामाजिक न्याय - डॉ.धर्मवीर क्षीरसागर, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर ६३

१५ ज्ञानोदय व ख्रिचन मिशनरींचे सामाजिक कार्य - डॉ.दिगंबर सोनवणे, नेवासा, जि.अहमदनगर ---------- ६७

१६ अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य
- डॉ. दिगंबर सोनवणे, नेवासा, जि.अहमदनगर ---------- ७०

१७ आधुनिक समाजाच्या जडणघडणीत संत साहित्याचे योगदान - डॉ. [illegible], जि.पुणे ७३

१८ भारतातील स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
- डॉ.दीपा पाटील, कळंबोली, नवी मुंबई ---------- ७६

१९ प्रखर राष्ट्रवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. [illegible], नागपूर ---------- ८०

२० नटसम्राट : [illegible]
- डॉ.बी. एस. [illegible], आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- ८४

२१ **ईस्ट इंडिया कंपनी कालीन कायदे – चिकित्सक आढावा (इसवी सन १७५७ ते १८५८)**
– डॉ. गोवर्धन दिकोंडा, माढा, जि.सोलापूर ---------------------------------- ८६

२२ **सामाजिक इतिहासाचे महत्व व समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास**
– डॉ.हरिदास जाधव, शिरूर, जि.पुणे ---------------------------------------- ९०

२३ **बार्डोली सत्याग्रहातील वल्लभभाई पटेल यांची भूमिका**
– डॉ.जयंत रामटेके, सडक अर्जुनी, जि.गोंदिया ---------------------------------- ९३

२४ **स्वातंत्र्योत्तर काळातील कृषी विकासाच्या प्रगतीच्या प्रवृत्तीचा अभ्यास**
– डॉ. के.पी.देशमुख, महागाव, ता.गडहिंगलज, जि.कोल्हापूर -------------------- ९९

२५ **राष्ट्रउभारणीत (विकास) कृषी आणि उदयोग क्षेत्राचे योगदान** – डॉ.के.जी.ढोबळे, अमरावती -- १०४

२६ **आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर** – डॉ.के.बी.वासनिक, गोंदिया ---- ११०

२७ **१८५७ च्या उठावतील आदिवासी क्रांतिकारक राणी अवन्तीबाईचे योगदान**
– डॉ.लक्ष्मण गोरे, २) प्रदीप चव्हाण, ?? ---------------------------- ११४

२८ **आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
– १) डॉ. एल. एच.नंदेश्वर, २) डॉ.आर.एम. मेश्राम, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर. ---------- ११९

२९ **दलित चळवळींचा राष्ट्र उभारणीमधील सहभाग**
– डॉ. माधुरी देवतळे, नागपूर --------------------------------------- १२४

३० **राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील मुलतत्त्वे आणि बौद्ध विचार**
– डॉ.महेंद्र गायकवाड, नागपूर --------------------------------------- १३०

३१ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत नागपूर जिल्ह्यातील कामठी नगर पालिकेच्या कार्याचे योगदान**
– डॉ.ममता इलमकर, ?? --------------------------------------------- १३३

३२ **राजसत्तेच्या फटीतून होळकर या मराठे सरदार घराण्यातील तुळसाबाई होळकर**
– डॉ.मंगला गोरे, नागपूर ------------------------------------------ १३६

३३ **दलित स्त्री चळवळीच्या शिलेदार श्रीमती शांताबाई सरोदे**
– डॉ.मंजुषा धापूडकर, अमरावती ------------------------------------ १३९

३४ **वर्तमान शैक्षणिक व वैज्ञानिक विकास : मानवाच्या आर्थिक स्थैर्यास घातक**
– डॉ.मंजुषा ठाकरे, नागपूर ----------------------------------------- १४१

३५ **डॉ. बी. आर. आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान : (जल नियोजनाच्या विशेष संदर्भात)**
– डॉ. निशांत शेंडे, नंदुरबार. ---------------------------------------- १४६

३६ **स्वातंत्र्य सैनिक रायकुमार भोगीलाल गुजर यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान**
– डॉ.पद्माकर गोरे, शिरूर, जि.पुणे ---------------------------------- १४९

३७ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी स्त्रियांचे योगदान : दुर्लक्षित महिलांच्या संदर्भात**
– डॉ.प्रज्ञा कामडी, मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर ------------------------ १५२

३८ **स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून स्त्रीमुक्तीत समाजसुधारकांच्या चळवळीचे योगदान**
– डॉ. प्रमिला भुजाडे, नागपूर. -------------------------------------- १५७

३९ **कम्युनल ट्रॅंगल इन इंडिया** – डॉ. पी. ए. ओलेकर, आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली -------- १६२

४० **आधुनिक भारताचे निर्माते – डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
– डॉ.प्रतिभा गाडवे, नागपूर --------------------------------------- १६८

४१ **स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यिक प्रगती**
- डॉ.प्रवीणा नागपूरकर, नागपूर ---------------------------------------- १७३

४२ **लातूर जिल्हापरिषदेतील ओबीसींचा राजकीय विकास व आधुनिकीकरणाचे विश्लेषण (१९९२–२०१२)**
- १) डॉ. राहुल बावगे, नागपूर, २) डॉ.असीम खापरे, पुसद ------------------- १७६

४३ **भारतीय स्वातंत्र्य चळवळी संदर्भात जातीच्या प्रश्नाची डॉ.आंबेडकर कृत चिकित्सा**
- डॉ.राहुल गोंगे, नारायणगाव, जि.पुणे ------------------------------------ १७९

४४ **कोरोना विषाणूचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम**
- डॉ.राजेश बहुरूपी, भिवापूर ---------------------------------------- १८२

४५ **आदिवासी जमातींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान** - डॉ.राजू पवार, शिरपूर, जि.धुळे. - १८५

४६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीयांचे योगदान** - डॉ. राजू जाधवर, कळंबोली, नवी मुंबई---- १८८

४७ **भारतीय संविधान निर्मिती आणि विकास** - १)डॉ.रायन महाजन, नागपूर, २) डॉ.संदीप तुंदूरवार, नागपूर, ३) डॉ.शरद सांबारे, नागपूर, ४) डॉ.राहुल चुटे, मुरमाडी ---------------------- १९०

४८ **हरितक्रांती व त्याचे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले परिणाम**
- १)डॉ. सचिन भोगेकर, नागपूर, २) डॉ.नितीन कायरकर, नागपूर. ---------------- १९४

४९ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान**
- डॉ. संजय ढवळे, मोहपा, जि.नागपूर ---------------------------------- १९८

५० **ग्रामीण क्षेत्रात नागरी आधारभूत सुविधांची तरतूद योजनेचा संक्षिप्त आढावा**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, -------------------- २०२

५१ **भारतीय दुग्ध उद्योगाची कामगिरी**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड --------------------- २०७

५२ **महाराष्ट्रातील कृषी विषयक विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान**
- डॉ.सतिश राठोड, नागपूर. ------------------------------------------ २१४

५३ **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यांमधून दिसणारी समाज सुधारणाविषयक भुमिका : एक चिंतन**
- डॉ.शिल्पा शेटे, पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे -------------------------------- २१७

५४ **१९४२ ची चले जाव चळवळ व पहिला झेंडा वंदन** - डॉ.श्रीकांत सोनटक्के, नागपूर, ------ २२४

५५ **राष्ट्रीय काँग्रेसच्या आरंभीच्या राजकारणात न्या. म. गो. रानडे यांची भूमिका**
- डॉ. श्रीनिवास सातभाई, अमरावती. ---------------------------------- २२८

५६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान**
- १)डॉ.सोनिया डावरे, औरंगाबाद २)डॉ.शीला स्वामी, उस्मानाबाद---------------- २३३

५७ **नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील परिवर्तन** - डॉ.सोनू लांडे, पनवेल, जि.रायगड ---------- २३७

५८ **वैश्विक स्त्रीवादाचे स्वरूप, भूमिका व वाटचाल** - डॉ. सुधाकर चौधरी, शिरपूर, जि.धुळे. --- २४१

५९ **छत्रपती शिवाजी महाराज यांचे जलव्यस्थापन**
- १)डॉ.सुजाता गौरखेडे, नागपूर, २)डॉ.सचिन बन्सोड, नागपूर ------------------ २४४

६० **बहिष्कृत हितकारिणी सभा : अस्पृश्य समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणणारी संस्था**
- डॉ.सूर्यकांत कापशीकर, नागपूर ---------------------------------------- २५०

ISSN No. 2394-5990


६१ **ओ.बी.सी समाजाची आरक्षण धोरणाबाबत राजकीय अनभिज्ञता**
– डॉ.सुशांत चिमणकर, नागपूर ---------------------------------------- २५६

६२ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत स्त्रीवादी साहित्याचे योगदान**
– डॉ.सुशिला लाखे, उमरेड, जि.नागपूर . -------------------------------- २६३

६३ **ब्रिटिशकालीन भारतीय रेल्वे आणि तिचे दुष्परिणाम (इ.स.१८५३–१९१४)**
– डॉ.यु.ए.पठारे, नारायणगाव, जि.पुणे ---------------------------------- २६८

६४ **माहिती तंत्रज्ञान युगात मूल्याधिष्ठीत समाज व मानवी संसाधन निर्मितीमध्ये माहितीची आवश्यकता : एक दृष्टीक्षेप** – डॉ.विजय बर्फे, शहादा, जि.नंदुरबार, --------------- २७३

६५ **स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नेतृत्व आणि लोकसहभाग**
– डॉ.विजय राऊत, नारखेड, जि.नागपूर . -------------------------------- २७६

६६ **आधुनिक भारताच्या निर्मितीत राजा राममोहन रॉय यांचे योगदान** – डॉ.विमल राठोड, नागपूर -- २८०

६७ **नवकवी बा.सी.मर्ढेकर– स्वातंत्रोत्तर कविता** – डॉ.विशाखा कांबळे, नागपूर ------------ २८३

६८ **सेनापती बापट यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विविध क्षेत्रांतील योगदान**
– डॉ. व्ही.आर.गवारी, अहमदनगर. ------------------------------------ २८६

६९ **कोण म्हणतं टक्का दिला (नाटक)** – डॉ.रमेश बलभीम जाधवर, कळंबोली, नवीमुंबई ------ २९१

७० **डॉ. पंजाबराव देशमुख यांचा 'भारत कृषी समाज' : एक आर्थिक अभ्यास**
– डॉ.बालाजी अण्णासाहेब सुरवसे, फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग ------------ २९५

७१ **महात्मा गांधी यांचे नेतृत्त्व आणि चळवळ** – डॉ. रेखा जाधव, नागपूर --------------- ३००


♦♦♦

# भारतीय संविधान निर्मिती आणि विकास

१) डॉ. रायन महाजन
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
२) डॉ. संदिप तुंदूरवार
राज्याास्त्र विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
३) डॉ. शरद सांबारे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, योोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर, नागपूर
४) डॉ. राहुल चुटे
स्व. निर्धनराव पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय, मुरमाडी (तुप)

**सारांश :**

भारतीय संविधानाची निर्मिती ही स्वतंत्र भारतासाठी एक मोठी उपलब्धी होती. अनेक प्रयत्नाने भारताचे स्वतंत्र संविधान लिहिले गेले. भारताचे संविधान लिहिण्याची पार्श्वभूमी म्हणजे ब्रिटिश कालखंडामध्ये भारताचे संविधान असावे अशी वेळोवेळी होणारी मागणी होय. स्वातंत्र्य आंदोलनामध्ये याची धग कायम होती यांची प्रचिती वेळोवेळी संविधान निर्मितीच्या मागणीने दिसत होती. भारतातील विद्वानांनी आणि घटनाकारांनी स्वतंत्र, समता, बंधुता, न्याय, लोकशाहीवर आधारित समाज निर्मिती, राष्ट्रीय एकता ही तत्त्वे समोर ठेवून संविधानामध्ये आदर्श मूल्य समाज उपयोगी तत्त्वांचा पुरस्कार करून राष्ट्राला आदर्श स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न संविधानाच्या निर्मितीने केला. संविधानाच्या निर्मितीत आणि विकासात अनेक घटना महत्त्वपूर्ण ठरल्या आहे. जनतेला अनुरूप, समाज उपयोगी आणि राष्ट्र उपयोगी अशा संविधान निर्मितीची आपेक्षित होती आणि ती अपेक्षा संविधान लिहून पूर्ण झाली. संविधानाचा विकास योग्य आहे मात्र संविधान बदलविण्याचा आज होत असलेला सूर हा योग्य नाही. भारतीय संविधान निर्मितीची मागणी ही एक भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच भाग होता. भारतीय नागरिकांना स्वतंत्र राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून भारताचे राजकीय भवितव्य घडविणे हा प्रयत्न संविधान निर्मिती मागचा होता. १८८५ मध्ये स्वराज्य विधेयकात घटनासमितीची मागणी करण्यात आली होती. म गांधीजी आणि अनेक नेत्यांनी घटना समितीचा विचार मांडलेला होता. ब्रिटिशांनी भारतात प्रशासकीय दृष्टीने अनेक कायदे केले. या कायद्यांचा प्रभाव भारतीय संविधानावर दिसून येतो. १९४६ पासून घटनानिर्मितीची प्रक्रिया सुरू झाली होती आणि दि.२४ जानेवारी १९५० ला संविधानावर हस्ताक्षराने पूर्ण झाली. भारतीय संविधानात आजपर्यंत १०४ संविधानवीशोधन झालेले आहे. प्रत्यक्ष कामकाजाच्या दिवसापासून तर आजपर्यंत सामाजिक न्याय, राष्ट्रीय विकास आणि राष्ट्र उभारणी या दृष्टिकोनातून संविधानाचा विकास होत गेला. सदर शोधनिबंधात ब्रिटिश कालखंडापासून तर आजपर्यंत संविधानाच्या विकासात्मक घटकांवर लिखाण करण्यात आले आहेत.

**बिज शब्द** – भारताचे संविधान, घटना दुरूस्ती, संविधान सभा, घटनात्मक विकास.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधात संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया आणि घटनात्मक विकास या घटकांवर विचार मांडण्यात येत आहे. सदर शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे. ते खालील प्रमाणे :

१. भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया आणि संविधानाच्या विकासचा अभ्यास करणे.

२. भारतीय संविधानामध्ये झालेल्या घटनादुरुस्तीचा भारतीय समाज व्यवस्थेवर झालेला परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी काही गृहितके मांडण्यात आली आहे. गृहितके संशोधनाला दिशा दाखविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

१. भारतीय संविधान देशाच्या अंतर्गत व्यवस्थेला मजबूत करण्यास महत्त्वाचे ठरले आहे.

**भारतीय संविधान निर्मितीची पार्वभूमी :**

इ. स. १६०० ला भारतात व्यापाराचा दृष्टिकोन ठेऊन ब्रिटिश भारतात आले. १७५७ च्या प्लासीच्या युध्दानंतर ब्रिटिशांनी भारतात ब्रिटिश सत्तेचा पाय रोवला. १७६३

 ISSN No. 2394-5990

च्या बक्सारच्या लढाईने भारतात ब्रिटिशांनी पाया मजबूत केला. ब्रिटीशांनी १७७३ ला 'रेगुलेटिंग एक्ट' ने भारतात कंपनीच्या प्रशासनावर ब्रिटिश संसदीय प्रशासनाची ही सुरुवात होती.[१] त्यामुळे हा कायदा अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. १८३३ चा रेग्युलेटिंग एक्ट, १८५३ चा कायदा भारतीय परिषद कायदा, १८६१ भारतीय परिषद कायदा, १८९२ चा सुधारणा कायदा, १९०९ चा मर्लेमिंटो सुधारणा कायदा, १९१९ मोंटेग्यू चेमसफोर्ड सुधारणा कायदा, सायमन आयोग, पूर्ण स्वराज्याचा प्रस्ताव, १९३० ची गोलमेज परिषद आणि श्वेतपत्र, काँग्रेसची विविध अधिवेशने, १९३५ चा कायदा, क्रिप्स योजना, वेवेल योजना, कॅबिनेट मिशन योजना आणि १९४७ भारत स्वातंत्र्याचा कायदा अशा अनेक कायद्यांच्या आणि योजनांच्या प्रयत्नाने भारतीय संविधान निर्मितीला चालना मिळाली. भारतीय संविधान निर्मितीसाठी अनेक घटना महत्त्वपूर्ण ठरल्या ज्यामुळे भारतीय संविधानाला मूर्तरूप प्राप्त झाले. अनेक विद्वानांच्या विचाराने संविधानाची निर्मिती झाली. म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद अशा अनेक महान व्यक्तींच्या प्रयत्नातून संविधान उदयास आले. १९२२ ला म. गांधींनी आपल्या विचारांतून भारताच्या भविष्याबद्दल आपले मत व्यक्त करताना म्हटले की, 'ब्रिटिश संसदेकडून भारताला स्वातंत्र्य मिळाले पण स्वराज्य ही काही त्यांच्याकडून भेटीदाखल मिळणारी गोष्ट नाही. भारतीयांनी स्वयंस्फूर्तीने निवडून दिलेल्या प्रतिनिधींना त्यांच्या इच्छाशक्तीच्या उर्मीतून स्वराज्य घडवावे लागेल.'[२] स्वराज्य आणि संविधान या दोन्ही गोष्टी भारतीयांकडूनच मिळाल्या पाहिजे असे म. गांधीजींचे विचार होते.

**भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया :**

भारतीय संविधानसभेची संकल्पना ही भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या माध्यमातून वेळोवेळी व्यक्त करण्यात आली होती. इ. स. १९१९ नंतर संविधानसभेचा विचार म.गांधीजींनी १९२२ ला मांडला. त्यानंतर १९२५ ला दिल्ली येथे सर्वदलीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. तेज बहादुर सप्रू यांच्या अध्यक्षतेखाली 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिल' चे प्रारूप तयार करण्यात आले होते. त्यामध्ये थोडा बदल करून या सर्वदलीय संमेलनात हे बिल मांडण्यात आले होते. १९२४ व १९२५ ला मोतीलाल नेहरू यांनी 'भारतीयांसाठी भावी संविधान भारतीयच तयार करेल' अशा आशयाची मागणी केली होती.[३] भारतीय संविधानाचे सिद्धांत निर्धारित करण्याकरिता मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आली आणि त्यांनी दि.१० ऑगस्ट १९२८ ला रिपोर्ट तयार केली. याच रिपोर्टला 'नेहरू रिपोर्ट' म्हटल्या जाते. या रिपोर्टमध्ये भारतीयांनी भारतीयांसाठी सर्वगुणसंपन्न संविधान तयार करण्याच्या शिफारशीसह भारतीय संविधानाच्या प्रारूपच्या रुपरेषेचा समावेश होता. हाच पहिला प्रयत्न होता की जो भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा मानला जातो. सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदेच्या अपयशानंतर ब्रिटिशांना भारतीयांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी १९३५ चा कायदा बनवावा लागला. या कायद्याला भारताच्या संविधानाचा आधार म्हणता येईल. या कायद्यातील अनेक तरतुदी भारताच्या संविधानात नंतर घेण्यात आल्या. १९३६ च्या लखनऊ येथील काँग्रेसच्या अधिवेशनात एक प्रस्ताव स्वीकारला गेला ज्यामध्ये कोणत्याही बाहेरील सत्तेद्वारा थोपविण्यात येणाऱ्या कोणत्याही संविधानाचा भारत स्वीकार करणार नाही. भारताचे संविधान जनतेद्वारा प्रौढ मतदानाच्या आधारे निर्वाचित भारतीय संविधान सभेद्वारा बनले पाहिजे.[४] हा प्रस्ताव म्हणजे भारतीयच भारताचे संविधान तयार करणारे होते. इ. स. १९३७ मध्ये केंद्रीय विधानसभा आणि काँग्रेस प्रणीत प्रांताच्या प्रांतीय विधानसभेत स्वतंत्र भारतासाठी एक नवीन संविधान बनविणारा प्रस्ताव पास करण्यात आला. दि.१९ नोव्हेंबेर १९३७ ला म. गांधींनी 'हरिजन' मध्ये लेख लिहिला. त्यामध्ये आपले विचार व्यक्त करताना ते म्हणतात की, ''संविधानसभाच देशीय देशज प्रतीचे आणि लोकांच्या इच्छेचे खऱ्या अर्थाने निरूपण करणारे संविधान बनवू शकते.''[५] गांधीजींना विश्वास होता की देशज प्रतीचे लोक संविधान तयार करेल. १९४० च्या ऑगस्ट प्रस्तावाद्वारे ब्रिटिश सरकारने भारतीय संविधान सभेच्या मागणीला अधिकारीक स्वरूपात मान्य केले होते. त्यानंतर १९४२ ला क्रीप्स योजनेच्या माध्यमातून ब्रिटिश शासनाने भारताची घटनासमिती निर्माण करण्याचे मान्य केले. पण क्रिप्स योजना फेटाळण्यात आली व घटना समितीच्या निर्मितीला खीळ बसली.

इ. स. १९४५ ला प्रांतीय विधीमंडळाच्या निवडणुका झाल्या. यामधून संविधान निर्मितीसाठी ३८९ सदस्य संख्या निर्धारित केल्या गेली. प्रांतीय विधानमंडळामध्ये निवडून आलेल्या सदस्यांना घटनासमितीमध्ये निवडून पाठवायचे होते. यातून २९६ सदस्यांना निवडून द्यायचे होते. त्यामध्ये ४ प्रतिनिधी सदस्य चीफ कमिशनरच्या चार प्रांतातून आणि

९३ प्रतिनिधी भारतीय संस्थानिकांचे राहणार होते. २९६ जागांपैकी २०८ जागा काँग्रेसला मिळाल्या. उरलेल्या १६ जागा पाच लहान गटांना प्राप्त केल्या आणि मुस्लिम लीग कडे ७३ जागा गेल्या. विभाजनानंतर मुस्लिम लीगच्या प्रतिनिधीची संख्या २८ वर आली.[६] अशा स्वरूपाची संविधानसभा तयार करण्यात आली होती. या घटनासमितीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. काँग्रेसच्या कार्यकारणीतील जास्तीत जास्त सदस्य होते. घटनासमिती ही भारत सरकारचा एक भाग होती. म्हणजे घटना समिती एका अर्थाने भारतीय संसद होती. या संविधान सभेच्या सदस्यांच्या अथक प्रयत्नांतून संविधान तयार करण्यात आले आहे. संविधानसभेने संविधान निर्मितीचे कार्य १२ अधिवेशनात पूर्ण केले. पहिले अधिवेशन दि.९ डिसेंबर १९४६ ला सुरू झाले. तर ते दि.२३ डिसेंबर १९४६ ला संपले. या पहिल्या अधिवेशनात संविधानसभेचे सभापतीची निवड आणि पंडित नेहरूंद्वारा प्रस्तुत उद्देश प्रस्तावावर चर्चा झाली आणि यासारखे महत्त्वपूर्ण कार्य केले. दुसऱ्या अधिवेशनात विविध समित्यांवर आणि संविधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून डॉ. एच. सी. मुखर्जी यांची निवड केल्या गेली. तिसऱ्या अधिवेशनात देशी संस्थाने आणि मूलभूत अधिकारावर चर्चा करण्यात आली. चौथ्या अधिवेशनात राष्ट्रध्वजाला स्वीकृती देण्यात आली. तर पाचवे अधिवेशन दि.१४ ऑगस्ट १९४७ ते ३० ऑगस्ट १९४७ या कालावधीत झाले. या अधिवेशनात भारतीय स्वातंत्र्य अधिनियम १९४७ च्या तरतुदींच्या अधीन झाले आणि संविधानसभा पूर्ण प्रभुत्व शक्तिशाली संस्था बनली. संघ, राज्य आणि समावर्ति सूची तयार करण्यात आली.[७] सहावे अधिवेशन फक्त एक दिवस चालले. या अधिवेशनात पश्चिम बंगाल आणि पूर्व-पंजाबच्या प्रतिनिधींची संख्या वाढवली. संविधान सभेच्या सातव्या अधिवेशनामध्ये प्रारूप संविधानावर चर्चा करण्यात आली आणि १९३५ च्या कायद्यातील तरतुदींना संशोधित करण्यात आले. आठव्या अधिवेशनात कलम २१ ते ३०१ पर्यंत चर्चा झाली. तर नवव्या अधिवेशनात प्रारूप संविधानाच्या कलम ३०५ वर विचार करण्यात आला. हिंदी आणि अन्य भाषांमध्ये संविधानाचे अनुवाद करण्यास स्वीकृती देण्यात आली. दहाव्या अधिवेशनात तिसऱ्या वाचनाची प्रक्रिया निर्धारित करण्यात आली. अकराव्या अधिवेशनात तिसरे वाचन पूर्ण झाले. बारावे अधिवेशन दि.२४ जानेवारी १९५० ला पार पडले. या अधिवेशनात डॉ. राजेंद्रप्रसाद यांना राष्ट्रपती म्हणून निर्वाचित करण्यात आले आणि संविधानावर सदस्यांनी हस्ताक्षर केले. या संपूर्ण अधिवेशनांमध्ये भारतीय जनतेसाठी भारतीयांकडून संविधान तयार करण्यात आले होते.

दि.२६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलबजावणी करण्यात आली. संविधानची निर्मितीसाठी बारा अधिवेशने झालीत. प्रस्तावित संविधानाच्या अहवालावर ७६३५ संशोधन प्रस्तुत करण्यात आले. त्यापैकी २४७३ संशोधनावर विचार करण्यात आला. भारताचे संविधान लिहिण्यास २ वर्ष ११ महिने १८ दिवसांचा कालावधी लागला तर या कार्यास जवळपास ६४ लक्ष रुपये खर्च आला. संविधानाच्या अंतिम प्रतीत ३९५ कलमे आणि ८ अनुसूची होत्या.

**भारतीय संविधानातील दुरुस्त्या :**

मानवसमाज हा विकसनशील आहे त्यामुळे वेळोवेळी मनुष्याच्या गरजा ह्या परिस्थितीनुसार बदलत जातात. भारतीय संविधान लवचिकतेचे उदाहरण आहे. कारण अंशत: परिवर्तनीय हे भारतीय संविधानाचे वैशिष्ट्य आहे. संविधानाचा विकास साधारणता रुढी-परंपरा, न्यायालयीन निर्णय आणि संशोधन या तीन घटकांवर होत असते. मात्र आधुनिक काळातील संविधानाच्या विकासाचा अभ्यास केल्यास विकास हा घटनादुरुस्तीने झालेला दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'कुणीही असे निर्धास्तपणे म्हणू शकतो की भारतीय संघराज्याला व्यवस्थेचा कडकपणा किंवा कायद्याचा वाद यांचा कधीच त्रास होणार नाही कारण लवचिकता हे या संघराज्य व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे.'[८] घटनेत एखादी सुधारणा करावयची असेल तर ती किती सोपी आहे हे त्याच्या लवचिकतेवरून दिसून येते. मात्र सुधारणा करताना समस्या निर्माण होत असेल तर ते तिच्या कठीण प्रक्रियेवरून दिसून येते. भारताची राज्यघटना लवचिक जरी असली तरी तिची भारताच्या जडणघडणीला आणि राष्ट्र उभरणीला मदत झाली आहे. घटनादुरुस्तीची प्रक्रिया ही भारतीय संविधान निर्मात्यांच्या उदात्त विद्वत्तेचे उदाहरण आहे. ही प्रक्रिया जरी गुंतागुंतीची वाटत असली तरी भारतासारख्या देशात अशा प्रक्रियेची गरज होती. ही वैशिष्ट्यपूर्ण व वैविध्यपूर्ण प्रक्रिया घटनाकारांनी घटनेच्या कलम ३६८ मध्ये वर्णीत केली आहे. सुधारणा प्रक्रियेचा मसुदा तयार करण्याचे काम १९४७ मध्ये सुरू झाले. तेव्हा सुधारणांकडे बघण्याचा दृष्टिकोन पारंपरिक होता. के. एम. मुंशी, के. टी. शाह, बी. एन. राव, पण्णीकर, एच. सी. मुखर्जी, अय्यर आणि अयंगार यांच्या प्रमुख प्रयत्नाने सुधारणा प्रक्रियेवर संविधान सभेत चर्चा घडून आल्या आणि संविधान संशोधनाच्या तीन प्रक्रिया ठरविल्या गेल्या.

पहिली प्रक्रिया संसदेच्या साध्या बहुमताने आणि राष्ट्रपतीच्या स्वीकृतीने विधेयकात संविधानात संशोधन केल्या जातात. दुसरी प्रक्रिया म्हणजे संसदेच्या विशेष बहुमताने आणि तिसरी प्रक्रिया म्हणजे अर्ध्या राज्यांपेक्षा अधिक राज्ये विधिमंडळाच्या स्वीकृतीने आणि संसदेच्या विशेष बहुमताने संशोधन केल्या जाऊ शकते. या तीनही पद्धतीने वेगवेगळ्या परिस्थितीत संविधानात दुरुस्त्या केल्या जातात.

भारतात आजपर्यंत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या आहे. पहिल्या घटनादुरुस्ती पासून तर शेवटच्या घटनादुरुस्ती पर्यंत अनेक बदल करण्यात आले आहे. हा घटनात्मक विकास पाहता लक्षात येईल की परिस्थितीनुसार आणि काळानुसार घटनेत बदल करता येते. घटनानिर्मितीची परिस्थिती आणि आताची परिस्थिती विचारात घेतली तर संशोधन करणे गरजेचे होते. परिस्थितीनुसार संदर्भात बदल होऊन परिवर्तनाचा स्वीकार करावा लागतो. परिस्थितीनुसार परिवर्तन न झाल्यास काही गोष्टी कालबाह्य होतात. मग त्यात सुधारणा करून त्याजागी नवीन घटकांचा समावेश करणे गरजेचे असते. तेव्हाच त्याचे अस्तित्व टिकून राहते. भारतीय संविधानात ज्या दुरुस्त्या झाल्या त्या परिस्थितचे गांभीर्य ओळखून समाज आणि राष्ट्रांच्या विकासासाठी करण्यात आल्या आहे. सामाजिक परिवर्तनात राष्ट्राच्या विकासाच्या खुणा असतात. त्यामुळे सामाजिक परिस्थिती मजबूत करून दुरुस्त्या आवश्यक असतात. यामुळे समजाबरोबरच राष्ट्राचीही जडण घडण होते.

प्रत्येक घटनादुरुस्तीहीमागे राष्ट्रहित, समाजहित जुडलेले असतात. पहिल्या घटनादुरुस्ती मध्ये सामाजिक व शैक्षणीक मागास घटकांच्या उन्नतीसाठी राज्यांना विशेष शक्ति प्रदान केल्या गेली. तेविसाव्या घटनादुरुस्तीने अनुसूचित जाती आणि जनजाती यांच्यासाठी सरकारी नोकरीत आरक्षणाचा कालावधी पुढील दहा वर्षासाठी वाढविला. ४२ व्या घटनादुरुस्तीने समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि राष्ट्रीय एकात्मता या शब्दांचा उद्देशपत्रिकेत समावेश केला. अशा अनेक घटनादुरुस्तीने समाजाच्या व देशाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय संविधानाची निर्मिती ही एक स्वतंत्र आंदोलनाचा भाग होता. भारताच्या संविधानसभेची निर्मिती ही प्रांतिक विधीमंडळाकडून निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून झाली होती. अनेक विद्वान लोकांचा भारतीय संविधानसभेत समावेश होता. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या सभेत वकिलांचा समावेश अधिक प्रमाणात होता. त्यामुळे संविधानाच्या प्रत्येक घटकांवर बारकाईने आणि चिकित्सक पध्दतीने चर्चा होऊन जगातील सर्वात मोठ्या संविधानाची निर्मिती झाली. संविधान निर्मितीत ब्रिटिशकालीन कायद्याचा प्रभाव दिसून येता. सोबतच अमेरिका, जर्मनी, कॅनडा आणि ब्रिटन या देशांच्या संविधानातून काही तरतुदी घेण्यात आल्या आहेत, त्यामुळे त्यांचा प्रभाव सुद्धा आपल्या संविधानावर दिसून येतो. संविधानातील मूलभूत अधिकार भारतीय नागरिकांना जीवन जगण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरतात. आजपर्यंत म्हणजे २०२० पर्यंत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. मूळ संविधानात ३९५ कलमे आणि ८ अनुसूची होत्या. २०१७ पर्यंत घटनादुरूसत्यांचा विचार केला तर १०१ दुरुस्त्या झाल्या होत्या. यामध्ये समावेश केलेल्या कलामांचा विचार केल्यास संविधानात एकूण ४४८ कलमे, आणि १२ अनुसूची दिसून येतात. या घटनादुरुस्तीने भारतीय समाज जीवन प्रभावित करून राष्ट्राच्या उभारणीला आणि व्यवस्थेला अधिक मजबुती प्राप्त करून दिली आहे.

**संदर्भ –**


१. सुभाष कश्यप, 'हमारा संविधान भारत का संविधान और संवैधानिक विकास', नेशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, पाँचवी आवृत्ती, २०१२, पृ.क्र.९.
२. गॅनविल ऑस्टिन, अनु. भारती केळकर, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३, पृ.क्र.१.
३. सुभाष कश्यप, 'हमारा संविधान भारत का संविधान और संवैधानिक विकास', पुर्वोक्त, पृ.२५.
४. कित्ता, पृ.क्र.२६.
५. कित्ता, पृ.क्र.२७.
६. गॅनविल ऑस्टिन, अनु. भारती केळकर, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला, पुर्वोक्त, पृ.९.
७. ए.पी.अवस्थी, भारतीय शासन एवं राजनीती, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आगरा, पुनः मुद्रित, २०१३, पृ.क्र.२१०.
८. गॅनविल ऑस्टिन, अनु. भारती केळकर, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला, पुर्वोक्त, पृ.३२१.


●●●